# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७
## (सकाळी १०.३० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत)

(क) : **(सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.जयवंतराव जाधव, चंद्रकांत रघुवंशी, दत्तात्रय सावंत, विक्रम काळे, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदुरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.बाळाराम पाटील, अमरनाथ राजुरकर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) —**

"राज्यात शासनाने कर्जमाफी योजना जाहीर करणे, कर्जमाफी जाहीर होऊन सहा महिन्यापेक्षाही जास्त कालावधी होऊनसुध्दा अद्यापही शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नसणे, कर्जमाफीची घोषणा झालेली असली तरी सुध्दा कर्ज वाटपाचे नियोजन व्यवस्थित न झाल्याने कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर राज्यात अद्याप सुमारे १५०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, इनोव्हेव या कंपनीचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी या योजनेत ऑनलॉईन पध्दतीने अर्ज मागवून नंतरच कर्जमाफी रक्कम देण्याचा घाट घातलेला असणे, ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी शेतकऱ्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागत असणे, शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या रकमांची सरकारच्या वतीने वारंवार खोटी आकडेवारी जाहीर करण्यात येणे, मात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर किती रक्कम जमा झाली याची जिल्हानिहाय व तालुका निहाय आकडेवारी जाहीर करण्याचे मात्र सोईस्कररित्या टाळणे, राज्यात ९० टक्के पेक्षा जास्त बी.टी.कॉटन कापसावर बोंड अळीचे संकट येणे, शेतकऱ्यांच्या कापसाचे ९० टक्के पेक्षा जास्त नुकसान होणे, हे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या फवारणीमुळे राज्यातील ३० पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा मृत्यु झालेला असणे, कॉटन रिसर्च इन्स्टीट्युट यांनी डिसेंबर, २०१५ मध्येच बोंड अळीबाबत अहवाल दिल्यानंतर या येऊ घातलेल्या संकटाकडे जाणीव करुन दिलेली असणे, बोगस कंपन्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारामुळे हे संकट आलेले असणे, यात कोट्यावधी रुपयांचा कॉटन सिड स्कॅम असणे, राज्यात तूर,

सोयाबीन, कापूस, उडीद, मुग यांची खरेदी होत नसणे, धानाचे केंद्र अद्याप सुरू झालेली नसणे, शेतकऱ्यांकडून सक्तीने संजीवनी योजनेच्या नावाखाली वीज बिलाची वसुली करण्यात येणे, राज्यातील मुंबईसह कोकणात ओखी वादळामुळे मच्छिमार व आंब्यासह सर्व फळ पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, किनारपट्टीवरील शेतकऱ्यांच्या पिकांबरोबरच घरांचेही नुकसान झालेले असणे, अनेक मच्छिमारांचे संसार उध्वस्त झालेले असणे, बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, त्यामुळे कोकणातील शेतकरी सुध्दा हवालदील झालेला असणे, याबरोबरच उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या काही भागात ओखी वादळामुळे हवामानात बदल होऊन पिकांवर किड रोगाचा प्रादुर्भाव वाढून नुकसान झालेले असणे, धानाच्या पिकावर मावा, तुडतुडे रोगाचा मोठा प्रादुर्भाव झालेला असणे, त्यामुळे उत्पादनात घट होणे, सर्वच शेतमालाला भाव न मिळणे, कृषी पिक विमा योजनेत खरीप व रब्बी हंमागातील पिक विमा नुकसान भरपाईसाठीचा हप्ता हजारो शेतकऱ्यांनी बँकेत भरणे, बँकांच्या हलगर्जीपणामुळे लाखो शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम मिळालेली नसणे, अनेक बँकांनी मंजूर विम्याची रक्कम इतरत्र गुंतवणूक करुन त्यावर कोट्यावधी रुपयांची नफेखोरी करणे, त्यातच कर्जमाफी न मिळणे, बोंड अळीमुळे आलेले संकट, यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वैफल्यग्रस्तता वाढून आत्महत्यांचे वाढत जाणारे सत्र, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने त्यांना कर्जमुक्त करणे, बोंड अळीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल एकरी २५ हजार रुपये मदत देण्याची आवश्यकता, सक्तीने होणाऱ्या वीजबिल वसुलीला स्थगिती देणे, हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची आवश्यकता, ओखी वादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत मदतीची गरज, या सर्व बाबतीत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.०० ते १२.४५ वाजेपर्यंत)

**(ख)** : **श्री.सुनिल तटकरे,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.किरण पावसकर, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा — (मंत्र्यांच्या उत्तरासह ४५ मिनिटे) —**

"ओखी वादळामुळे मुंबईसह संपूर्ण कोकणात अतोनात नुकसान होणे, अरबी समुद्रातील या वादळामुळे रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांतील किनारपट्टीचे अतोनात नुकसान होणे, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळून पिकांसह इतर मालमत्तेचेही नुकसान होणे, कोकणात आंबा व काजूची मोठ्या प्रमाणात लागवड असणे, परंतू अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा व काजू पिकाचा मोहोर गळून पडणे, काही ठिकाणी मोहोर काळा पडल्याने तसेच गळून पडल्याने यावर्षी आंबा व काजू फळ पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणे, यामुळे बागायत शेतीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, तसेच सुपारीची

साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांनाही सुपारी भिजल्यामुळे आर्थिक फटका बसलेला असणे, रायगड जिल्ह्यातील पांढरा कांदा उत्पादन करणाऱ्या भागातील मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झालेले असणे, कोकणातील वाल, पावटा, तूर व इतर कडधान्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, काही ठिकाणी मळणीची कामे सुरू असताना पाऊस पडल्याने धानपिकाबरोबरच भातपेंड्याचेही नुकसान झालेले असणे, त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, जगप्रसिध्द देवगड हापूस आंब्याच्या उत्पादनावर व त्याच्या दर्जावरही विपरीत परिणाम होणार असणे, कोकणातील प्रमुख व्यवसाय असणाऱ्या मच्छिमार व्यवसायाचे यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, किनारपट्टीवर असणाऱ्या मच्छिमारांच्या राहत्या घराबरोबरच त्यांच्या बोटींचे नुकसान झालेले असणे, काही ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी बुडालेल्या असणे, एकंदरीतच कोकणातील शेतकऱ्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्याने तो आर्थिक संकटात सापडलेला असणे, फळपिकांवर आलेल्या संकटामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेला असणे, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे लोण आता फळपिक नुकसानीमुळे कोकणातही सुरू होते की काय, अशी भिती शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येणे, त्यामुळे कोकणातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व मच्छिमारांना त्वरीत नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी व सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —**

**(क) उच्च व तंत्र शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री :**

(१) "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा बारावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) "महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१६-

२०१७ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) कृषी मंत्री** : **(१)** "वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे सन २००९-२०१० ते २०१२-२०१३ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** "वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ६** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"तळोजा, ता.पनवेल (जि.रायगड) येथे एम.आय.डी.सी. परिसरात महानगरपालिकेचे डंपिंग ग्राऊंड असल्यामुळे नागरिकांना विविध आजाराला सामोरे जाण्याची परिस्थिती निर्माण होणे."

(२) **श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ७** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"एससी/एनटीडी च्या बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे तब्बल २४ वर्षे अधिव्याख्याता ते प्राचार्य पद भूषवणारे व त्याचे सर्व लाभ उपभोगणारे मौलाना आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा अटकपूर्व जामीन नामंजूर झाल्यामुळे सदर आरोपीला अटक करुन तपास करण्याची आवश्यकता असतांनाही तपास यंत्रणाकडून होत असलेली दिरंगाई."

(३) **श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ४** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"औरंगाबाद शहरात आपत्कालीन केंद्रासाठी महानगरपालिकेने करोडी शिवारात जागा निश्चित केलेली असून शासनाकडे सादर

केलेल्या फायर स्टेशनच्या मागणीनुसार लागणारी पदे व निधी उपलब्ध करून देण्याबाबत."

(४) **सर्वश्री जयंत पाटील,** बाळाराम पाटील, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **वने मंत्री** निवेदन करतील **:-**

"थळ, ता.अलिबाग (जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील चाळमळा-थळ डोंगरी व मयेकर डोंगरी (चाळमळा-थळ) येथील वास्तव्यास असलेल्या नागरीकांना वन विभाग त्रास देणे, दमदाटी करणे व खोट्या केसेस दाखल करण्याची धमकी देत असल्याबाबत."

(५) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील **:-**

"राज्यात राज्य शासनाने कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळा बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे ग्रामीण, आदिवासी गरीब आणि बहुजन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा निर्माण झालेला प्रश्न."

(६) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **वैद्यकीय शिक्षण मंत्री** निवेदन करतील **:-**

"राज्यातील सरकारी रुग्णालयातील उपचाराचा खर्च सर्वसामान्य व गरीब रुग्णांच्या आवाक्याबाहेर गेल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला असंतोष."

(७) **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ८** वर **सहकार मंत्री** निवेदन करतील **:-**

"मौजे उमापूर, ता.गेवराई, जि.बीड येथील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत २०१६-२०१७ करीता स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर या बँकेत पिक विमा हप्ता विहित भरलेला असूनही बीड जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेने पिक विमा नुकसान भरपाईच्या रकमेवर मोठ्या प्रमाणात नफेखोरी करून शेतकऱ्यांना रकमेपासून वंचित ठेवणे."

(८) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **कामगार मंत्री** निवेदन करतील **:-**

"दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी बीड जिल्ह्यातील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यातील ऊसाच्या गरम रसाचा हौद फुटून पाच

कामगारांचा मृत्यू झाल्याची घडलेली घटना."

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर येथील जरीपटका परिसरात असलेल्या सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांच्यावर विविध कलमांन्वये गुन्हे दाखल असून अँन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडून सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नागपूर यांना सदर एज्युकेशन सोसायटीवर कार्यवाही करुन फिक्स बॉडी नेमण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात आलेला असणे, शासनाकडून अँन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांना सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, मुख्याध्यापक व सचिवांची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिलेले असूनही याप्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर फी वसूलीस मदत करणाऱ्या शिक्षण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, भ्रष्टाचाराचे व बेहिशेबी मालमत्ता जमा करणाऱ्या सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांच्यावर कोणीही कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांची मालमत्ता लवकरात लवकर जप्त करुन शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** धनंजय मुंडे, अॅड. निरंजन डावखरे, सर्वश्री. बाळाराम पाटील, नरेंद्र पाटील, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, अॅड. राहुल नार्वेकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माणगांव, महाड, व रोहा हे रायगड जिल्ह्यातील प्रमुख तालुके असणे, अनेक उद्योग या तालुक्यात नव्याने निर्माण होत असणे, माणगांव तालुक्यात पाटणूस ही एक प्रमुख ग्रामपंचायत असणे, या ग्रामपंचायतीमार्फत विविध विकास कामे सुरु असून त्यामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होत असणे, घरकुल योजनेत समाविष्ट असलेल्या लाभार्थींच्या नावांमध्ये तफावत असणे, जाहीरात खर्च, पेट्रोल डिझेलवरचा खर्च यावर नियमबाह्य खर्च होत असणे, याबाबतीत सरपंच / उपसरपंच व ग्रामसेवक यांचेकडे तोंडी व लेखी तक्रारी करुनही ग्रामस्थांना समाधानकारक उत्तरे मिळत नसणे, जिल्हा परिषदेमार्फत सुरु असलेल्या बांधकामाचे विकास कामावर ग्रामपंचायतीमार्फत रक्कम काढण्यात येणे व विकासकास नियमबाह्यरित्या वितरीत करण्यात येणे, ग्रामसभा व ग्रामस्थ यांना विचारात न घेता फक्त सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या आर्थिक हितासाठी विकासकामे करत असणे, भिरा धरण येथे बोटींग परवाना

देऊ नये असा ग्रामसभेचा ठराव असतांना त्याबाबतीत ग्रामपंचायतीने कोणतीच कारवाई न करणे, देवकुंड धबधब्यावर येणाऱ्या पर्यटकांकडून स्वच्छता कर वसूल होत असतांना त्याचे कोणतेही अभिलेख ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसणे, अशाप्रकारे ग्रुप ग्रामपंचायत, पाटणूस मनमानी पध्दतीने कामकाज करत असणे, सदरहू कामात मोठ्या प्रमाणात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याची ग्रामस्थांची पूर्ण खात्री झालेली असणे, ग्रामस्थांनी ग्रुप ग्रामपंचायत पाटणूस यांच्या सन २०१४ पासून आजपर्यंतच्या सर्व कारभारांची सखोल चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषदेकडे करणे, या भ्रष्टाचाराला तालुका स्तरावरील विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) गट विकास अधिकारी व इतर अधिकारी यांची मुक संमती असणे, बिरवाडी, ता. महाड ग्रामपंचायतमध्येही नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने या योजनेत आर्थिक गैरव्यवहार केलेला असणे, नळ पाणीपुरवठा योजनेच्या पुर्णत्वानंतर एक वर्ष ठेकेदाराकडून देखभाल दुरुस्तीचा खर्च अपेक्षित असतांना ग्रामपंचायनेच ती बिले अदा केलेली असणे, ठेकेदाराचा आर्थिक फायदा करुन अनेक आर्थिक गैरव्यवहार या ग्रामपंचायतीमध्ये झालेले असणे, ऐनघर ता. रोहा ग्रामपंचायतमध्ये १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात अफरातफर केलेली असणे, कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता खरेदी केलेल्या असणे, जुन्याच कामावर या निधीतून खर्च केलेला असणे, अंतर्गत रस्ते दुरुस्ती कामे या निधीअंतर्गत करण्यात येऊन त्याच त्याच ठेकेदारांना त्याच-त्याच कामावर अनेकवेळा पैसे दिलेले असणे, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांची चौकशी करण्याविषयी चौकशी अधिकारी / विस्तार अधिकारी यांनीही टाळाटाळ करणे, चौकशीचे अहवालही देण्यात न येणे, यामुळे या सर्व ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व चीडीची भावना, या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांचेवर शासनाने त्वरीत करावयाची कारवाई, त्यांना पदावरुन निलंबित करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

(३) **श्रीमती हुस्नबानू खलिफे,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. सुनिल तटकरे, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील नाणार सागवे परिसरात नाणार पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प करण्याचे शासनाचे धोरण असणे, याकरीता नाणारसह १५ गावातील १५ हजार एकर जागा, औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर करणे, जमीन संपादित करण्याची शासनाने अधिसूचना काढलेली असणे व ग्रामस्थांचा विरोध डावलून पोलिस बंदोबस्तात जोर जबरदस्तीने जमिनी मोजणीचे काम हाती घेण्यात आलेले असणे, या नियोजित प्रकल्पा शेजारी

जैतापूर अणू ऊर्जा प्रकल्प सुरु असणे, या प्रकल्पाजवळच फक्त ५ ते १० कि.मी. अंतरावर नाणार रिफायनर प्रकल्प उभारण्याचे शासनाचे धोरण असणे, वास्तविक या दोन्ही प्रकल्पांचा व आजूबाजूचा परिसर इको सेंन्सेटीव्ह झोन म्हणून जाहिर करण्यात आलेला असणे, या पेट्रोकेमिकल्स प्रकल्पांमुळे एकूण १,५०,००० आंबा, काजू बागायतदार आणि विजयदुर्ग खाडी आणि समुद्रात मासे मारणाऱ्या मच्छिमारांचे नुकसान होणार असून मौजे नाणार, विलये, डोंगरगांव, सागवे, उपळे, तारळ, कुंभवडे, म्हाळंगे,चौके साखर पडवे अशी एकूण १४ ग्रामपंचायतीच्या गावांमध्ये सदर ग्रीन रिफायनरी पेट्रोकेमिकल्स प्रकल्पामुळे आंबा, काजू, तसेच मच्छिमारांचे होणारे मोठे नुकसान, त्यामुळे सदर प्रकल्प नको असे ठराव पारित करुन शासनाकडे पाठविलेला असणे, ग्रीन रिफायनरी नाणार प्रकल्प, आयपीएल, बीपीएल, आयओसीएल या केंद्र सरकारच्या कंपन्या मिळून करीत असून माडबन जैतापुर येथे होत असलेला अणु ऊर्जा प्रकल्प या संकल्पित रिफायनरी पेट्रोकेमिकल्स प्रकल्पापासून फक्त दहा किलोमीटरवर असणे, या राजापूर तालुक्याला लागून असलेल्या देवगड तालुक्यातील हीपडवणे, फणसे, पालये इत्यादि गावांना ३२/२ च्या नोटीसा देण्यात आलेल्या असणे, राजापूर तालुक्यातील अर्जुना नदीवर आणि उपनद्यांवर तालुक्यातील शेतीसाठी धरण बांधलेले असणे, परंतु धरणाच्या कालव्यांचे काम पूर्ण नसल्यामुळे शेतीला गेली कित्येक वर्षे पाणी नसणे, या प्रकल्पाकरिता पाणी वापरल्यास शेतीला पाणी मिळणार नसून या प्रकल्पाचा तपशीलवार अहवाल शासनाने जनतेने मागणी करुनही अद्यापी दिलेला नसणे, मच्छिमारांचा शेतकऱ्यांचा, बागायतदारांचा परंपरागत व्यवसाय नष्ट होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार असणे, याशिवाय या प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणामुळे येथील ग्रामस्थांना अनेक गंभीर आजार होण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे ग्रामस्थांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवून आंदोलने सुरु केली असतानाही शासनाने याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील ग्रामस्थांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने येथील हा प्रदूषणकारी प्रकल्प रद्द करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. विनायकराव मेटे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मे. गोयल गंगा डेव्हलपर्स (इंडिया) प्रा. लि. यांच्या वडगाव (बु.) सर्व्हे नं. ३५ ते ४० येथील बांधकाम प्रकल्पामध्ये अनेक नियमांचे व कायद्याचे मोठे उल्लंघन झालेले असल्यामुळे मा. हरित लवाद, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. जिल्हा न्यायालय येथे अनेक खटले दाखल असणे, पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA) चे कामकाज ऑगस्ट २०१७ पासून बंद असणे, SEIAA च्या शेवटच्या (११२ व्या) बैठकीत सदर बिल्डरला पर्यावरण दाखला देण्याचा

निर्णय झालेला नसणे, असे असतानाही पर्यावरण सचिव यांनी बेकायदेशीररित्या व अधिकार नसताना मे. गोयल बिल्डर्स यांना पर्यावरण दाखला देणे, सदर बिल्डर्सने पर्यावरण दाखल्यासाठी केलेला अर्ज दिशाभूल व बनावट माहितीवर असणे, राज्यस्तरीय मुल्यमापन तज्ञ समिती (SEAC - 3) आणि आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांनी केलेले मुल्यमापन आणि आघात मुल्यांकन चुकीचे असणे, प्रकल्पामुळे पर्यावरणाची रोज मोठी हानी होत असणे, तरीही पर्यावरण सचिव यांनी नियमबाहय पध्दतीने पर्यावरण दाखला देणे, याच प्रकल्पात बिल्डरला पर्यावरण हानी व नियमांच्या उल्लंघनामुळे मा. हरित लवाद, पुणे यांनी तब्ब्ल १०५ कोटी रुपयांचा दंड ठोठावणे, "पर्यावरण कायदा – १९८६", "जलकायदा – १९७४" आणि "वायुकायदा – १९८१" प्रमाणे सदर बिल्डरवर फौजदारी गुन्हा दाखल करणे, आवश्यक असतांनाही पर्यावरण सचिव यांनी कर्तव्यात कसूर करणे व बिल्डरला पाठीशी घालणे, मा. हरित लवाद, पुणे, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकल्पाला पर्यावरण दाखला देणे संबंधी कोणतेही आदेश दिलेले नसताना पर्यावरण सचिव यांनी पर्यावरण दाखल्यात आणि SEIAA च्या ११२ व्या बैठकीत तसे खोटे नमुद करणे, मा. हरित लवाद, पुणे यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पर्यावरण सचिव यांच्यावर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असणे, तरीही कोणतीही कारवाई न होणे. बिल्डर्स, मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकारी, पुणे म.न.पा. बांधकाम विभागाचे अधिकारी व काही भ्रष्ट राजकीय नेते यांचे मोठे रॅकेट कार्यरत असणे, बिल्डर्सला निरनिराळे परवाने बेकायदेशीररित्या देण्यासाठी कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असणे, या संदर्भात सी.बी.आय. मार्फत चौकशी होण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. प्रकाश गजभिये,** किरण पावसकर, हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. आनंद ठाकूर, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, संजय दत्त, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.अमरनाथ राजूरकर, सुभाष झाबंड, जनार्दन चांदूरकर ॲड. राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"प्रत्येक गांव व पाड्यातील प्रत्येक घरामध्ये सौभाग्य अलंकार या नावाने पंतप्रधानांनी विद्युत पुरवठा करण्याची घोषणा केली असली तरी राज्यात १११ गावांमध्ये वीज पोहचली नाही, हे कटु सत्य असणे, केंद्रसरकारने कोळशाची निर्माण केलेली कृत्रिम टंचाई, पुरवठा कंपन्यांनी राज्याला ३० वॅगन्स कोळसा पुरविणे अपेक्षित असणे, राज्याला सध्या १८ ते २० वॅगन्स एवढाच

कोळसा मिळत असणे, गेल्या काही महिन्यांपासून राज्याला कोल इंडिया कंपनीकडून पुरेसा कोळसा उपलब्ध होत नसल्यामुळे महानिर्मितीच्या प्रकल्पांना मोठा फटका बसल्याने महानिर्मितीकडून साधारणपणे साडेसहा हजार मेगावॅट वीज उपलब्ध होणे अपेक्षित असता त्यात दोन हजार मेगावॅटहून अधिक घट झाल्याने महावितरण कंपनीला महानिर्मिती, अदानी कंपनी, रतन इंडिया, केंद्रीय प्रकल्पाकडून जलविद्युत प्रकल्प, उरण प्रकल्प व सीपीजीएल आदि विविध कंपन्यांकडून वीज घ्यावी लागणे, परळी औष्णिक विद्युत केंद्रातून १०० पेक्षा अधिक मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता असतानाही आजघडीला केवळ ३२५ मेगावॅट वीजनिर्मिती सुरु असणे, तेथील केंद्रात आठ संचांपैकी ५ संच पूर्णपणे बंद असणे, त्यातील संच क्रमांत ३ अवसायनात काढणे, परिणामी संच क्र. ३, ४ व ५ मधून प्रत्येकी २१० मेगावॅट वीज निर्मिती होणे तर संच क्र. ६ व ७ मधून प्रत्येकी २५० मेगावॅट निर्मिती होणे तर संच क्र. ८ नवीन असूनही तो वारंवार बदं पडत असणे, आदि कारणांमुळे राज्याला पुन्हा एकदा भार नियमनाला सामोरे जाण्याची निर्माण झालेली शक्यता, तसेच राज्यात अनेक ठिकाणी असलेले जलविद्युत प्रकल्प, त्यातून वीज निर्मिती प्रभावीपणे होणे शक्य असतानाही या जलविद्युत प्रकल्पांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, मुंबईतील मुलुंड, भांडुप, कल्याण, नाशिक, नागपूर या शहरांमध्ये ऑक्टोबर, २०१७ पासूनच लोडशेडिंग सुरु झालेले असणे, पनवेलचा शहरी भाग, कळवा, दिवा, मुंब्रा व कल्याण या भागात सुरु असलेले लोडशेडिंग विचारात घेता शाळांच्या सहामाही परिक्षा सुरु होत असतानाच लोडशेडिंगचे उभे ठाकलेले संकट, अनेक भागात वीज पुरवठा खंडित होणार याची अधिकृत माहितीच ग्राहकांना उपलब्ध करुन दिली जात नसल्याने तसेच वीजेवर अवलंबून असलेली कामे रखडत असल्याने लोकांमध्ये तीव्र असंतोष व प्रचंड संताप पसरला असल्याने या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावर “सेया” या इमारतीचे काम सुरु असतांना सेंट्रिंगचा काही भाग कोसळून दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेली दुर्घटना, सदर अपघातात तीन कामगारांचा जागीच झालेला मृत्यू, तर एक कामगार गंभीर जखमी होणे, सदर दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांची नोद नसल्याचे उघडकीस येणे, बांधकाम व्यावसायिक / ठेकेदारांनी मजुरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याच सुविधा उपलब्ध केल्या नसल्याचेही निदर्शनास येणे, पिंपळे सौदागर येथेही झुलेलाल टॉवर या बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या आवारात एका मजूर महिलेच्या डोक्यात सातव्या

मजल्यावरून वासा पडून तिच्या झालेल्या मृत्युबाबतची घटना, मात्र तिच्याकडे दुर्लक्ष करीत बिल्डरच्या दबावामुळे पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल न करणे, तिच्या नातेवाईकांनादेखील याची माहिती मिळू न देणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री आणि कामगार मंत्री यांच्याकडे निवेदन सादर करून सदर दुर्घटनेत मृत्यूमूखी पडलेल्या बांधकाम मजुरांच्या नातेवाईकांना १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आल्याचे समजणे, संबंधित ठेकेदार व विकासक यांच्यातील करार ऑनलाईन उपलब्ध व्हावेत, बांधकाम मजुरांची नोंदणी करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करावा आदि मागण्या करणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. जगन्नाथ शिंदे,** धनंजय मुंडे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. हेमंत टकले, सुनिल तटकरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक २६ मे, २०१६ रोजी डोंबिवली (जि. ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील प्रोबेस कंपनीत केमिकल रिॲक्टरचा स्फोट होऊन १३ कामगारांचा मृत्यू तर शेकडोजण जखमी झालेले असणे, तर नोव्हेंबर, २०१७ मध्ये अल्युफिन या कंपनीत झालेल्या कोम्प्रेसरच्या स्फोटाने पुन्हा एकदा डोंबिवली हादरली असताना राजेंद्र जावळे या कामगाराचा मृत्यू झालेला असणे, याच वर्षी ऑगस्ट, २०१७ मध्ये इंडो-अमाईन या कंपनीतही स्फोट झाल्याची घटना ताजी असताना एकूण डोंबिवली शहर हे ज्वालामुखीच्या तोंडावर असल्याचे वरील घटनांतून वारंवार अधोरेखित झालेले असताना, सदरहू घटना नक्की का घडत आहेत व त्यावर कसे नियंत्रण आणले जाऊ शकते याबाबत शासनाने कोणतीही भूमिका न घेणे ही खेदाची बाब असणे, ३६२ हेक्टर्स मध्ये पसरलेल्या व सुमारे १७०० रासायनिक कारखाने असलेल्या डोंबिवली औद्योगिक परिसरातील औद्योगिक व नागरी सुरक्षेबाबत शासनाचा उदासीनपणा वेळेवेळी उघड झालेला असणे, मा. मुख्यमंत्र्यांनी प्रोबेस कंपनीच्या स्फोटाचा चौकशी अहवाल एका महिन्यात देण्याचे आदेशित केलेले असताना, दीड-ते पावणे दोन वर्ष झाल्यानंतरही स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधिनी वेगवेगळ्या माध्यमातून शासनाचे याबाबीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला असताना, शासनाकडून मात्र नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या या न्याय्य मागणीला वाटाण्याचा अक्षता लावण्यात आलेल्या असणे, भविष्यात अशा घटना घडू नयेत व त्यावर नियंत्रण व्हावे यासाठी शासनाने तातडीने ठोस कारवाई न केल्यास डोंबिवलीचा भोपाळ होण्यास फारसा अवधी लागणार नसल्याची जनसामान्यांची भावना झालेली असणे, प्रोबेस अहवाल व इतर कंपन्यातील

स्फोटानंतर शासनाने स्वीकारलेल्या उदासीन धोरणामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असल्याने, प्रोबेस कंपनीतील स्फोटाचा अहवाल विनाविलंब घोषित करून, याठिकाणी भविष्यात असे अपघात होणार नाहीत याबाबत शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख** - **(असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस.)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.

**१.** मुख्यमंत्री.

**२.** महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

**३.** वित्त व नियोजन, वने मंत्री.

**४.** आदिवासी विकास मंत्री.

**५.** कृषी, फलोत्पादन मंत्री.

**६.** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

**७.** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

**८.** रोजगार हमी, पर्यटन मंत्री

**९.** पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री.

**१०.** कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री.

**सात : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन

विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**आठ : (क)** **ॲड. अनिल परब,** श्री. प्रविण दरेकर, डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रसाद लाड, सुजितसिंह ठाकूर, रामनिवास सिंह, गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. चंदुभाई पटेल, परिणय फुके, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाश्यांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाश्यांचे त्याचठिकाणी पुनर्वसन करणे, मुंबईतील भुमिपुत्र असलेल्या कोळीवाड्यातील बांधवांना कायमची घरे व कोळीवाड्यांचा पुनर्विकास करण्याची गरज, आशियाखंडातील सर्वात मोठ्या मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वकांक्षी निर्णय, सदरहू

झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, मुंबईसोबतच पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, नाशिक व सर्व महाराष्ट्रात स्वस्त घरांच्या योजनांना गती देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**प्रा.अनिल सोले,** ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही

योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.**

**"राज्यात कापूस व सोयाबीन पिकांवर विषारी किटकनाशक फवारणी केल्यामुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत"** या विषयावरील श्री. धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३५३९० ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.**

**"राज्यातील निजाम आणि ब्रिटीशकालीन पुलांची दुरुस्ती करण्याबाबत"** या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१३०० ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १८ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.